महा वितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
**४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.**
**दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११**

जा.क्र. : काऔसंवि/ब/वाहन खरेदी /**३०३२९** दिनांक : **०५/१०/२०११**

# परिपत्रक

विषय : दुचाकी वाहन खरेदी करण्याकरिता महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना बँकेकडून विशेष सवलत कर्ज योजना.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र.काऔसंवि/ब/वाहन खरेदी/२३०७९ दि.२२/७/२०११.

********

महावितरण कंपनीतील अधिकारी / कर्मचारी (विशेषतः विद्युत वाहिनीवर काम करणारे अधिकारी / कर्मचारी) यांना वेळोवळी वीज ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी वारंवार क्षेत्रीय ठिकाणी फिरावे लागते. त्यासाठी कल्याणकारी योजने अंतर्गत महावितरण कंपनीमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन (Motor Bike) खरेदी करण्याकरिता वित्त संस्थांकडून सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विविध वित्त संस्थांकडे विचारणा करण्यात आली होती. त्यामध्ये एच्.डी.एफ्.सी. बँक व हिरो होंडा तसेच होंडा एचएमएसआय यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार महावितरण कंपनीतील कर्मचारी दुचाकी वाहन (Motor Bike) खरेदी करण्यासाठी असलेल्या विशेष योजनेचा फायदा घेऊ शकतात.

सदर विशेष योजनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.(तुलनात्मक तक्ता)

| | महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यासाठी सवलत | बाजार भाव | बचत |
|---|---|---|---|
| (उदाहरणार्थ) कर्ज रक्कम | ५०,००० | ५०,००० | |
| मुदत | ३६ महिने | ३६ महिने | |
| प्रोसेसिंग फी | निरंक | १०००/- | १०००/- |
| व्याजाचा दर (प्रतिवर्षी) | ७.३% ते ७.७ % | १३.५ % | |
| स्टँम्प ड्युटी / हायपोथिकेशन व इतर आकार | ५५० | ९२० | ३७० |
| मासिक समान हप्ता (EMI) | १७५८ | १९३७ | ६४४४ |
| एकूण रक्कम | | | **७८१४** |
| उत्पादकाकडून मिळणारी सवलत | १००० | ० | १००० |
| उत्पादकाकडून मिळणारी सवलत आकार | ५०० (फक्त हिरो होंडा वाहनांसाठी) | ० | ५०० |
| एकूण फायदा | | | **९३१४/-** |

वरील तुलनात्मक तक्त्यावरुन असे दिसून येते की, महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सदर योजनेतून वाहन खरेदी केल्यास त्यांना रु. ९३१४/- चा फायदा होईल. याशिवाय या योजने अंतर्गत खालीलप्रमाणे फायदे सुद्धा अंतर्भूत आहेत.

१) सध्या बाजारात दुचाकी वाहन खरेदीकरिता प्रतीक्षा करावी लागते. परंतु या योजनेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन विक्रेत्यांकडून त्वरित उपलब्ध होणार आहे.

२) कर्मचा-याला वाहनाच्या रकमेच्या ९० ते ९५ टक्के इतकी रक्कम कर्ज म्हणून उपलब्ध होऊ शकेल.

३) कर्मचारी ज्या विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत त्या विभागीय कार्यालयात येवून एच.डी.एफ.सी. बँक व वाहन विक्रते त्यांच्या सेवा देणार आहेत. त्यासाठी कर्मचा-याने त्याच्या क्षेत्रातील एच.डी.एफ.सी. बँक किंवा दूरध्वनी क्र. **०२०३९४०१०१०** वर संपर्क साधावा.

४) सदर योजनेखाली मिळणारी विशेष सवलत ही वाहन खरेदीसाठी कर्ज घेणाऱ्यांच मिळेल.

५) कर्मचाऱ्याने आपल्या नोकरीचा राजीनामा दिला किंवा कर्मचारी सेवानिवृत्त झाला तर अंतिम देय असलेल्या रकमेसाठी कर्मचाऱ्याने या योजनेखाली घेतलेल्या कर्जाबाबत एच.डी.एफ.सी. बँकेकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' (No Objection Certificate) घेऊन महावितरण कंपनीच्या संबंधित कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

६) कर्मचाऱ्याला वाहन खरेदीसाठी उचलेल्या कर्जाची परत फेड करण्यासाठी कर्जाच्या हप्त्याचे पुढील तारखांचे आगाऊ धनादेश (Post dated Cheques) एच.डी.एफ.सी. बँककडे जमा करावे लागतील.

७) सदर योजना ही ऐच्छिक स्वरुपाची आहे.

महावितरण कंपनीच्या सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनाच या योजनेचा लाभ घेता येईल. त्यासाठी कंपनीचे ओळखपत्र किंवा नेमणूकीचे पत्र आणि चालू महिन्याचे पगारपत्रक (पे स्लिप) द्यावी लागेल. सदर योजने अंतर्गत कर्ज हे बँकेच्या नियमांप्रमाणे असून कर्ज देण्याचा अंतिम निर्णय एच.डी.एफ.सी. बँकेचा असेल. सदर योजना दि. ५ ऑक्टोबर, २०११ पासून अंमलात येणार असून त्याची अंतिम मुदत दि.३१ डिसेंबर, २०११ अशी असेल.

सदर योजनेची अधिक माहिती देण्यासाठी एच.डी.एफ.सी. बँकेचे अधिकृत प्रतिनिधी व वाहन विक्रेत्यांचे अधिकृत प्रतिनिधी विभागीय स्तरापर्यंत भेटी देतील. त्यांना या योजनेची कर्मचाऱ्यांना माहिती देण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छूक असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी बँकेच्या अधिकृत प्रतिनिधींशी / परिमंडळातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

राहुल गोवर्धन

(कर्नल राहुल गोवर्धन)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रति :
महावितरण कंपनीच्या शाखा कार्यालयापर्यंत प्रेषण यादीनुसार सर्वांना.

E:\Backup Of Meena\D Drive\kam B on\two wheeler loan.doc